# पुणें शहरांतील 'महाजन' व 'नगरशेठ'[१]

ध. रा. गाडगीळ

अर्थव्यवहारदृष्ट्या मराठी समाजाबाबतची अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे 'महाराष्ट्रीय' असा लौकिकदृष्ट्या समजला जाणारा किंवा आपणांस तसें समजणारा वाणी समाज आपणांकडे नाहीं. कोंकणी वैश्य असें संबोधलेल्या कांहीं जाती या विधानास अपवादात्मक आहेत, पण कोंकणांतहि यांची संख्या लहान व त्यांच्या व्यवहाराचा विस्तार थोडा. तेथील व्यवहारहि मुख्यतः मूळ परप्रांतांतून आलेल्या निरनिराळ्या वाणी व तत्सम जातींच्या हातीं आहे. महाराष्ट्रीय वाणी समाजच नसावा ही घटना खरोखर अत्यंत विस्मयजनक मानली पाहिजे. भारताच्या इतर सर्व प्रदेशांत तद्देशीय वाणी समाज कमीअधिक प्रमाणांत अस्तित्वांत असून व्यवहार करीत आहेत. ही घटना जशी विस्मयजनक तशीच अनर्थकारकहि मानली पाहिजे. यामुळें आपला समाज एकांगी बनला व राहिला व आर्थिक व्यवहाराची इष्ट दिशेनें वाढ होणें व त्याच्या वाढीचा व भरभराटीचा समग्र समाजास पुरा फायदा मिळणें हें झालें नाहीं. या मूलभूत पुरातन घटनेच्या अनुषंगानें अनेकविध ऐतिहासिक संशोधन व विवेचन करणें शक्य आहे व आवश्यक आहे. यापैकीं अजून कांहीं झालेलें नाहीं, व इतिहासज्ञांच्या लिखाणांत या परिस्थितीचा उल्लेखहि क्वचितच येतो.

महाराष्ट्रांत वाण्याची जात जवळजवळ नाहींच. याचें कारण, व्यापाराची वृद्धि होण्यास आवश्यक लागणारीं राजधानीचीं अगर उतारपेठेचीं ठिकाणें महाराष्ट्राच्या इतिहासांत फारशीं महत्त्वाचीं अशीं थोडीं आढळतात, असें डॉ. केतकर देतात.[२] भौगोलिक परिस्थितीमुळें प्रमुख व्यापारमार्ग दुसरीकडून गेले हें कारण व्यापाराची व उद्योगधंद्यांची विशेष वाढ न होण्यास असूं शकेल. पण थोडाबहुत तरी व्यापार प्रत्येक प्रदेशांत नेहमीं असणारच; असें असतां, हिंदुस्थानच्या इतर सर्व प्रदेशांत समाजरचनेचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग समजला गेलेला वाणी समाज मुळांत आपणांकडे नसावा हें एक कोडेंच वाटतें. या कूटप्रश्नाकडे महाराष्ट्राचा वसाहतकाल व महाराष्ट्र–समाजरचनेचा आदिकाल यांच्या अभ्यासकांनीं लक्ष देणें जरूर आहे.

महाराष्ट्रांत मूळचा वाणी समाज नव्हता आणि त्यामुळें बहुशः इतर जातींतील व्यक्ति येथें व्यापार–सावकारी करीत असत, असें शिवकालीन व पहिल्या दोनतीन पेशव्यांच्या काळांतील नोंदींवरून आढळतें. केव्हांतरी जुन्या काळीं येथें असलेल्या मूळच्या वाणीसमाजास परस्यांनीं येऊन मागें सारलें, असें राजवाड्यांनीं एकें ठिकाणीं म्हटलें आहे,[३] तें खरें मानण्यास

१ कै. दत्तोपंत आपटे यांच्या पंधराव्या स्मृतिदिनानिमित्त, ता. ९–११–५८ रोजीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वतीनें प्रा. ध. रा. गाडगीळ यांनीं एक व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानाच्या उत्तरार्धांत, अठराव्या शतकांतील पुणें शहरांतील सावकारी व्यवहाराबद्दल उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांवरून या शहरांतील गुजराती वनिया जातीचा आगमन–काल, तिचें महत्त्व, तिच्या संघटना व पुढारी याविषयीं प्रा. गाडगीळ यांनीं विवेचन केलें. तेवढा भाग प्रस्तुत लेखांत समाविष्ट केला आहे.

२ महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग १ ('हिंदुस्थान व जग'), पा. ४६१.

३ लेखसंग्रह भाग १. वि. का. राजवाडे, 'ऐतिहासिक प्रस्तावना', पा. ३५२.